११८

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.-एचओ/ ९४५६
दिनांक- 22/5/2020

# नियुक्ती आदेश

विषय - पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील आरोग्य खात्याकडे वैद्यकीय अधिकारी (वर्ग – २) या हुद्द्यावर ४५ दिवसांकरिता तात्पुरत्या स्वरुपात करार पद्धतीने सेवा घेणेबाबत.

संदर्भ - १. मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका ठराव क्र. १/५४, दि. २१/०५/२०२०.

आरोग्य खात्याकडे ४५ दिवसांच्या कालावधीसाठी एकवट वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध संवर्गातील पदांच्या सेवा घेण्याकरिता संदर्भ क्र १ चे ठरावान्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार वैद्यकीय अधिकारी (वर्ग – २) या पदावर खालील यादीमधील उमेदवारांची या नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून ४५ दिवसांच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करून सेवा घेण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १ | डॉ. पटेवार उदयकुमार बालाजीराव | यमुना निवास न्यू मुंढवा कंढेर |

१. वरील सर्व उमेदवारांना नियुक्ती कालावधीत दरमहा रु. ६०,००० एकवट वेतन दिले जाईल अन्य कोणतेही भत्ते दिले जाणार नाही.
२. वरील सर्व उमेदवारांच्या नियुक्तीचा कालावधी दि.२२/०५/२०२० ते दि.०६/०७/२०२० असा राहील.
३. निवड झालेल्या उमेदवारांकडून त्यांच्या पदाचा राजीनामा देणे पूर्वी एक महिन्याची पूर्व सूचना दिले नंतर राजीनामा मंजूर करावे नाहीतर नोकरी सोडते वेळी एक महिन्याचे मानधन पुणे महानगरपालिका कोष कार्यालयास भरावे लागेल.
४. वरील उमेदवार नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत रुजू न झाल्यास त्यांची निवड आपोआप रद्द होईल त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही तथापि रुजू होण्यास काही कालावधी लागणार असल्यास त्याबाबत त्याचे स्पष्ट कारण नमूद करून नियुक्ती आदेश मिळाल्यापासून एक आठवड्याच्या आत तसा लेखी विनंती अर्ज सादर केला पाहिजे. योग्य कारण नसल्यास रुजू होण्यासाठी मुदतवाढ मंजूर केली जाणार नाही.
५. सदर पदे भरण्याकरिता उमेदवारांकडून घ्यावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती सदर सेवेच्या कलावधीत उमेदवारांवर बंधनकारक राहतील.
६. वरील उमेदवारांनी सदर नियुक्तीबाबत कामावर रुजू झाल्यावर एक आठवड्याच्या आत स्वखर्चाने करार करून द्यायचा आहे.

७. वरील उमेदवारांच्या सेवा ह्या तात्पुरत्या स्वरुपात ४५ दिवसांच्या मुदतीसाठी एकवट वेतनावर घेण्यात येत असून वरील उमेदवारांना या आदेशाच्या सेवेचा आधार घेऊन भविष्यात पुणे महानगरपालिकामध्ये कोणत्याही पदावर हंगामी अथवा कायमस्वरूपी नेमणुकीसाठी हक्क सांगता येणार नाही.

८. नियुक्तीच्या कालावधीत समाधानकारक काम नसल्याचे आढळलयास एक महिन्याची नोटीस देऊन नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल.

९. उमेदवारांनी इ-मेल द्वारे सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे सदरच्या तात्पुरत्या नेमणुका देण्यात आल्या असून कागदपत्रांच्या पडताळणी बाबत काही कायदेशीर बाब उद्भवल्यास ह्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

१०. उमेदवाराने कामावर रुजू होताना जाहिराती मध्ये नमूद केलेली व अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती पडताळणी साठी सादर करणे आवश्यक आहे.

११. सर्व उमेदवारांनी कोविड-१९ कोरोना या विषाणूच्या बाबतीत योग्य ती काळजी व प्रशिक्षण संबंधित प्रशिक्षण देणाऱ्या अधिकाऱ्यांकडून घेऊन त्या प्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

| | |
|---|---|
| (डॉ. रामचंद्र हंकारे) | (रुबल अगरवाल) |
| आरोग्य अधिकारी | अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) |
| पुणे महानगरपालिका | पुणे महानगरपालिका |

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी –

१. मा. मुख्यलेखापरीक्षक, पुणे मनपा